## नियमित दिवाणी मुकदमा क्र.२८/२००८ मधील नि.क्र.२३० खालील आदेश
## (शंकर शामराव कदम *विरुध्द* अजित पांडूरंग दगडे (सुर्यवंशी) वगैरे–२०)
## (CNR-MHSN090005372008)

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी सि.पी.सी. कलम ११४, १५१ व १५२ प्रमाणे नि.२२४ अर्जावरील आदेश परत घेणेबाबत दाखल केलेला आहे.

२. वादीच्या कथनाप्रमाणे प्रस्तुतचा दावा हा अतिक्रमण काढून कब्जा मिळणेबाबत व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये वादीतर्फे व प्रतिवादीतर्फे पुरावा संपलेला आहे. वादीने दि.१७.११.२०१८ रोजी प्रतिवादीचा उलटतपास घेतेवेळी दि.१४.११.२०१८ च्या फेरिस्तसोबत वादमिळकतीचे दि.२६.०९.१९४६ रोजीचे खरेदीपत्र मोडी लिपीत असल्यामुळे त्याचे भाषांतर (अनुवाद) तुकाराम बाळु माळी यांनी केलेले आहे. सदर भाषांतराची प्रत व प्रस्तुत भाषांतर वादी स्वतः केले आहे. म्हणून तुकाराम बाबु माळी यांचे भाषांतर केलेबाबत ॲफिडेव्हीट व इतर कागदपत्रे व सदर कागदपत्रे मे.कोर्टात हजर केलेली आहेत व मे.कोर्टानी हजर करवून घेतलेली आहेत. प्रस्तुत वादीने प्रतिवादीच्या उलटतपासामध्ये प्रस्तुत कागदपत्रे रेफर केलेली होती तरीसुध्दा त्या कागदपत्रांना निशाणी पडली म्हणून वादी यांनी नि.२११ ला प्रस्तुत कागदपत्रांना निशाणी पडण्यासाठी अर्ज दिलेला होता. तो अर्ज मे.कोर्टानी नामंजूर केला व ''प्रस्तुतची कागदपत्रे ही पुराव्याच्या कामी शाबित झालेली नाहीत'' असा आदेश केला. म्हणून वादीने नि.२२४ कडे प्रस्तुत कागदपत्रावरील साक्षीदार तपासणे असलेबाबत व जादा व तोंडी पुरावा देणेस परवानगी मिळणेसाठी अर्ज दिला होता. परंतु, मे.कोर्टानी दि.२७.०७.२०१९ रोजी तो अर्ज नामंजूर केला म्हणून वादी हा प्रस्तुत अर्ज दिलेला आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागील पानावर त्यांचे म्हणणे देवून अर्जास विरोध केला आहे. वादीचा प्रस्तुत अर्ज सि.पी.सी. कलम ११४ प्रमाणे अर्ज देता येत नाही व रिकॉल करणेची तरतुद नाही. कलम १५१ प्रमाणे witness powers चा वापर करुन हुकूम करणे जरुर आहे असे मे.कोर्टाचे मत झालेस मे.कोर्टास तो अधिकार आहे. पक्षकाराचे अर्जावरुन कलम १४१ ची तरतुद वापरता येत नाही. मे.कोर्टाचे अधिकार अनिर्बंध आहेत. परंतु, ते अधिकार वापरण्यासारखी परिस्थिती ह्या अर्जाचे कामी उदभवत नाही. पूर्वीचा दि.२७.०७.२०१९ चा अर्ज गुणवत्तेवरच नामंजूर झालेला आहे. तसेच, पूर्वी झालेल्या हुकूमाचेकामी कोणत्याही प्रकारची clerical किंवा arithmetical mistake झालेली नाही. सबब, सि.पी.सी. कलम १५२ ची तरतुद पाहणेचे कारण नाही. सदर अर्ज ३० दिवसाचे आत दिला नाही. तो मुदतबाह्य आहे. सबब, अर्ज नामंजूर करणेत

यावा.

४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षकारांतर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादीविरुध्द अतिक्रमण काढून कब्जा मिळणेबाबत व निरंतर ताकिदीकरिता दाखल केलेला आहे. वादी यांनी त्याच्या युक्तीवादास भक्कम दुजोरा मिळावे म्हणून खालीलप्रमाणे प्रवाहनपत्र दाखल केले आहे.

1. Haridas Das Vs. Usharani Banik and ors. 2006(4) Mh LJ 14.
2. Haridas Das Vs. Usharani Banik and ors. AIR 2006 SC 1634.
3. Lily Thomas Vs. Union of India. AIR 2000 Supreme Court 1650.

५. याकामी वादीने नि.१९४ प्रमाणे दि.२०.०७.२०१८ रोजी व प्रतिवादी यांनी दि.२०.१२.२०१८ रोजी पुरावा संपलेबाबत पुरसिस दिलेले आहेत. त्यानंतर सदरचा दावा दि.०४.०१.२०१९ पासून अंतिम युक्तीवादाकरिता नेमण्यात आला आहे. परंतु, वादी यांनी दि.२१.०१.२०१९ रोजी नि.२११ कडे नि.२०१ प्रमाणे दाखल केलेल्या तीन कागदपत्रांना निशाणी देणेकरिता व ते कागदपत्रे पुराव्याकामी वाचण्यात यावे याकरिता दाखल केले होते. दि.२५.०२.२०१९ रोजी माझे पुर्वाधिकारी यांनी तो अर्ज नामंजूर केला होता. त्यानंतर वादी यांनी दि.२२.०४.२०१९ रोजी पुन्हा त्या अनुषंगाने अर्ज दाखल केले होते. तो अर्ज दि.२९.०७.२०१९ रोजी नामंजूर करण्यात आला होता. त्यानंतर वादी यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. वादीच्या अशा या वागण्यामुळे असे दिसून येते की, वादी हे जाणीवपुर्वक कायद्यातील तरतुदीचा गैरवापर करुन, काम प्रलंबित होणेकरिता, युक्तीवाद विलंब होणेकरिता वारंवार वेगवेगळे कारणावरुन अर्ज दाखल करीत आहेत. सबब या सर्वांचा विचार करता वादीचा सदरचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहेः–

## आदेश

१. वादीचा नि.२३० कडील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. सदर दावा दहा वर्षापेक्षा जास्त जुना असल्याने दोन्ही पक्षकार यांनी लवकरात लवकर युक्तीवाद करावा.

Jyotimala Chandrashekhar Gupta

Digitally signed by Jyotimala Chandrashekhar Gupta
Date: 2019.11.28 11:04:06 +0000

**तासगांव.** **(श्रीमती जे.सी. गुप्ता)**

**दि.२७.११.२०१९** **सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, तासगांव.**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Sou.G.A. Patil. |
| Court | : | Jt.Civil Judge Jr.Dn. and Judicial Magistrate F.C., Tasgaon. |
| Date | : | 27.11.2019. |
| Order signed by the Presiding officer on | : | 28.11.2019. |
| Order uploaded on | : | 28.11.2019. |